संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मुंबईतल्या मराठीपणावर पुन्हा गंडांतर

**मुंबई** ही महाराष्ट्राची राजधानी आहे आणि या महानगरातला मराठी टक्का म्हणजेच मराठी माणसांची संख्या वेगाने कमी होत चालली आहे. या सगळ्या परिस्थितीचे अतिशय परखड शब्दात आचार्य अत्रेंनी वर्णन केले होते. मुंबई महाराष्ट्रात आहे. पण मुंबईत महाराष्ट्र नाही. याच विधानाला पुष्टी देणारी परिस्थिती आज मुंबईत दिसून येते. या महानगराचे पालकत्व ज्या महानगरपालिकेकडे आहे. त्या महानगर पालिकेच्या वेगवेगळ्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड वेगाने घटते आहे. आणि त्यातला धक्कादायक भाग म्हणजे २०१७-१८ या वर्षामध्ये महापालिकेच्या ४६ मराठी शाळा बंद करण्याची वेळ आली. गेल्या सहा वर्षात जवळपास एक लाख मराठी विद्यार्थी घटल्याचेही त्या ताज्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. महापालिकेच्या प्रामुख्याने शिक्षण विभागाशी संबंधित तसेच नगरसेवकांच्या कामगिरीबाबत वेळोवेळी आढवा घेऊन किंबहुना अतिशय अभ्यासूपणे सर्वेक्षण करून महत्वाचे निष्कर्ष प्रजा फाऊंडेशन ही स्वयंसेवी संस्था काढत असते. तिच्या या ताज्या अहवालामध्ये मुंबईतल्या मराठी शाळांवर आलेल्या गंडांतराची किंवा संक्रांतीची आकडेवारीनिशी माहिती दिली गेली आहे. एकीकडे मराठीचा कैवार घेणाऱ्या साहित्य संमेलनांमधून किंवा मराठी संस्कृतीच्या संवर्धनासाठी कोट्यवधीची तरतूद करणाऱ्या आणि वारंवार वेगवेगळ्या योजनांच्या घोषणा करणाऱ्या शासनाच्या हेतूंबद्दलच आता प्रश्नचिन्ह निर्माण होते. कारण ४८ टक्के मराठी शाळा बंद पडतात. याचा अर्थ मुंबईतून मराठी केवळ हद्दपार नव्हे तर नेस्तनाबूत करण्याचाच हा मोठा डाव असल्याचे म्हणावे लागते. या शाळा का बंद पडत आहेत. याची अनेक कारणे देता येतील. परंतु त्यापेक्षाही मराठी शाळा बंद पडणार नाहीत. यासाठी कोणती उपाययोजना केली जाते. या बाबत मात्र कोणतेच ठोस कारण समोर येत नाही. म्हणजेच बंद पडणाऱ्या मराठी शाळांविषयी ना महापालिकेला ना महाराष्ट्र शासनाला किंवा मराठीचा कैवार घेणाऱ्या तथाकथित बुध्दीवंतांना यासंदर्भात काहीही घेणे देणे उरले नसल्याचे म्हणावे लागते. जी महानगरी राज्याची राजधानी मानली जाते. त्याचठिकाणी मराठीची इतकी दयनीय अवस्था होत असेल तर यासंदर्भात अतिशय जाणीवपूर्वक आणि उच्च स्तरावर शोध घेतला गेला पाहिजे. यासाठी तितक्याच कायमस्वरुपी उपाययोजना राबवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

### धोक्याचा इशारा

यवतमाळमध्ये नुकत्याच संपलेल्या साहित्य संमेलनात सर्वच वक्त्यांनी मराठी भाषेविषयी गळा काढला. शिक्षण मंत्र्यांनी मराठी शाळा बंद पडू दिल्या जाणार नाहीत. याची ग्वाही तर दिलीच. परंतु खाजगी शाळांमधूनसुध्दा मराठी विषयाची सक्ती करण्याबद्दल सरकारचे निश्चित धोरण नसल्याचेच त्यांच्या विधानातून स्पष्ट झाले. याचा अर्थ ज्यांनी मराठी भाषा, मराठी शाळा, मराठी संस्कृती या सर्वांचाच एकत्रितपणे धोरणात्मक विचार करण्याची आवश्यकता असते त्या संस्थांमध्येच मराठीच्या भवितव्याविषयी इतकी संदिग्धता असावी ही गोष्ट तर खरंच दुर्देवी म्हणावी लागते. मुंबई हे बहुभाषी शहर आहे. आणि आता विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात इंग्रजी भाषेला प्राधान्य आलेले आहे. लोकांना जगातल्या व्यवहाराची किंबा पोटापाण्याची भाषा म्हणून इंग्रजी अधिक महत्वाची वाटते. परंतु यासाठी संपूर्ण शाळा इंग्रजी माध्यमाचीच असली पाहिजे. किंवा मराठी माध्यम हे आता काळाच्या संदर्भात गैरलागू ठरते. असे जे चित्र निर्माण होत आहे हे अधिक निर्बुध्दपणाचे ठरते. मराठी शाळांमधून तितकाच सकस इंग्रजीचा अभ्यास होऊ शकतो. आणि मराठी भाषिक लोकांनी मातृभाषेतून शिक्षण घेण्याचे अनेक फायदे त्यांना समजावून देण्याची वेळ आली आहे. इंग्रजीतून बोलणे, इंग्रजीतून लिहीणे म्हणजे आपण आधुनिक आहोत किंवा आपण पुढारलेले आहोत हा भ्रम दूर करण्याची आवश्यकता वाटू लागते. असे प्रयत्न होत नसल्यामुळेच इंग्रजी महत्वाची आणि मराठी दुय्यम स्वरुपाची असाही एक समज पाहायला मिळतो. अर्थात पालिकेच्या एकूण शाळांपैकी इंग्रजी माध्यमाच्या चार शाळाही बंद पडल्या आहेत. इतर भाषांच्या शाळांना देखील गळती लागल्याचे प्रजा फाऊंडेशनच्या अहवालातून स्पष्ट होते. मग एकूणच पालिकेच्या शाळांचा दर्जादेखील या सगळ्या घसरणीला कारणीभूत ठरतो. खरे तर महापालिकेच्या शाळांच्या इमारती अतिशय प्रशस्त आणि भक्कम स्वरुपाच्या आहेत. या शाळा आदर्श स्वरुपात चालवण्याची जबाबदारी महापालिकेला टाळता येणार नाही.

### महाराष्ट्राच्या राजधानीत

शाळा बंद पडत असल्याचे कारण पुढे करून त्या इमारतींचे खाजगीकरण करण्याचाही डाव खेळला जात आहे. अनेक लोकप्रतिनिधी या शाळांच्या इमारती त्यांच्या स्वयंसेवी संस्थांना कशा मिळतील यासाठी धडपडताना दिसतात. तेव्हा मुंबईतल्या महापालिकेच्या मराठीपणावर आलेली ही मरगळ नेमकी कशामुळे आहे, याचा अतिशय वास्तवदर्शी वेध घेतला गेला पाहिजे. मुंबईतला मराठी माणूस हा केवळ महापालिकेच्या मराठी शाळांमुळे टिकून आहे असे आम्हाला म्हणायचे नाही परंतु जी मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे आणि ज्या राजधानीचे पालकत्व महापालिकेकडे आहे. त्या महापालिकेच्याच मराठी शाळांना इतक्या मोठ्या प्रमाणावर गळती लागणे हे काही चांगले लक्षण नाही. किंबहुना भविष्यातल्या एक मोठ्या धोक्याची ही तितकीच मोठी भयघंटा ठरते. ज्या मुंबईत संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन पेटले होते त्या मुंबईत याच मराठीच्या अभिमानासाठी १०५ हुतात्म्यांनी बलिदान केले होते. आणि याच मुंबईत त्या प्रचंड जनआंदोलनापुढे गुडघे टेकून मुंबईला महाराष्ट्राबरोबरच ठेवण्याची घोषणा केंद्राला करावी लागली होती. आज त्याच मुंबईतल्या मराठी शाळांची दुर्दशा म्हणजेच या महानगरीतल्या मराठी संस्कृतीचे उच्चाटन करण्याचे तितकेच मोठे निदर्शक ठरते. महापालिकेला , राज्यशासनाला तर खरोखरच मराठीपणाची चाड असेल तर त्यांनी महापालिकेच्या या बंद पडलेल्या सगळ्या शाळा या तितक्याच जोमाने सुरु करण्याचे कौशल्य दाखववावे. इंग्रजीचे महत्व मान्य करून मराठीदेखील तितकीच सन्मानाची भाषा आहे हे सिध्द करून दाखववावे.